मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल


बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिकेच्या 141 शाळांमध्ये आता 'आफ्टर-स्कूल'

## अभ्यासाव्यतिरिक्त विद्यार्थी होणार तंत्रज्ञान साक्षर; शिक्षण विभागाचा अभिनव उपक्रम

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेचा शिक्षण विभाग व 'दि अप्रेंटिस प्रोजेक्ट' (टॅप) यांच्या संयुक्त विद्यमाने भोसरी येथील अंकुशराव लांडगे नाट्यगृह येथे आफ्टर-स्कूल मॉडेलचा शुभारंभ करण्यात आला.

याप्रसंगी माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, कॅपजेमिनी इंडियाचे एक्झिक्युटिव्ह व्हाईस प्रेसिडेंट प्रसाद शेटये, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्रतिनिधी राजश्री तिटकारे, संस्थेचे सहसंस्थापक प्रशांत कुमार, अनामिका मुखर्जी, दिनेश साळवे, जुही शहा यांच्यासह १४१ शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते.




'दि अप्रेंटिस प्रोजेक्ट' या उपक्रमांतर्गत महानगरपालिकेच्या १४१ शाळांमध्ये २०२५-२६ शैक्षणिक वर्षासाठी आफ्टर-स्कूल मॉडेलची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, चिंतनशीलता, सहकार्य आणि संवाद कौशल्ये विकसित करणे असून विद्यार्थ्यांना फक्त परीक्षांसाठीच नव्हे तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या घडणीवर भर दिला जाणार आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना कला, कोडिंग, तंत्रज्ञान, आर्थिक साक्षरता यांसारख्या जीवनावश्यक कौशल्यांचे प्रशिक्षण मिळणार असून त्यांना भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी तयार केले जाणार आहे. त्याच अनुषंगाने अंकुशराव लांडगे सभागृह येथे झालेल्या कार्यक्रमात शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये शिक्षकांना उपक्रमाची उद्दिष्टे, कार्यपद्धती, अभ्यासक्रम, विद्यार्थी व शिक्षक नोंदणी प्रक्रिया तसेच मुख्याध्यापक आणि नोडल अधिकाऱ्यांची जबाबदारी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

> विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पुस्तकी ज्ञानासोबतच कला, कोडिंग, तंत्रज्ञान आणि आर्थिक साक्षरता यांसारखी कौशल्ये अत्यावश्यक आहेत. 'दि अप्रेंटिस प्रोजेक्ट' या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व आणि आत्मविश्वास वाढेल.
>
> **- प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

> 'दि अप्रेंटिस प्रोजेक्ट' हा उपक्रम सार्वजनिक शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण सुनिश्चित करण्याचे एक मोठे पाऊल आहे. शिक्षकांचे प्रशिक्षण आणि आफ्टर-स्कूल अनुभव विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास चालना देईल.
>
> **- किरणकुमार मोरे, सहायक आयुक्त, शिक्षण विभाग, पिंपरी चिंचवड महापालिका.**

---

# पावसामुळे पडलेली 10 झाडे अग्निशमन विभागाने तात्काळ हटवली

## दोन दिवसांमध्ये अग्निशमन विभागाच्या वतीने 10 ठिकाणांतील झाडे हटवून वाहतूक सुरळीत केली

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड शहरात १४ व १५ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या पावसामुळे १० ठिकाणी पडलेली झाडे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अग्निशमन विभागाच्या जवानांनी हटवली. झाडे पडल्याची माहिती अग्निशमन विभागाला मिळाल्यानंतर जवानांनी घटनास्थळी धाव घेत ती हटवून वाहतूक सुरळीत केली आहे. यातील काही झाडे घरांवर/भिंतीवर पडून टेकली होती. ती झाडे जमिनीवर पूर्णपणे पडण्याच्या धोका संभवत असल्याने व त्यामुळे परिसरातून प्रवास करणाऱ्याच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने सदरील अर्धवट पडलेल्या झाडास पूर्णपणे बाजूला करण्यात आले.



शहरामध्ये १४ व १५ सप्टेंबर असे सलग दोन दिवस पावसाने हजेरी लावली आहे. या पावसामुळे शहरातील वेगवेगळ्या भागात झाडे, फांद्या पडल्या. याबाबतची माहिती अग्निशमन विभागाच्या मुख्य नियंत्रण कक्षाला मिळाली. त्यानंतर अग्निशमन विभागाच्या जवानांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन तातडीने झाडे, फांद्या हटविण्याचे काम सुरू केले. १४ व १५ सप्टेंबर (सायंकाळी ४ वाजेपर्यंत) या दोन दिवसांमध्ये अग्निशमन विभागाच्या वतीने १० ठिकाणांतील झाडे हटवून वाहतूक सुरळीत केली आहे, अशी माहिती अग्निशमन विभागातून देण्यात आली. तसेच अर्धवट पडलेल्या झाडापासून नागरिकांनी दूर म्हणजेच सुरक्षित अंतर बाळगावे, आपत्कालीन परिस्थितीत तातडीने अग्निशमन विभागाच्या नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### अग्निशमन विभागाचे महत्त्वाचे दूरध्वनी क्रमांक:

- » पिंपरी मुख्य अग्निशमन केंद्र – ९९२२५०१४७५
- » भोसरी अग्निशमन केंद्र – ९९२२५०१४७६
- » प्राधिकरण अग्निशमन केंद्र – ९९२२५०१४७७
- » चिखली अग्निशमन केंद्र – ८६६९६९४१०१
- » थेरगाव अग्निशमन केंद्र – ७०३०९०७९९९
- » रहाटणी अग्निशमन केंद्र – ९९२२५०१४७८
- » मोशी अग्निशमन केंद्र – ७२६४९४३३३३
- » तळवडे अग्निशमन केंद्र – ९५५२५२३१०१
- » चोविसावाडी अग्निशमन केंद्र – ८४८४८०३१०१
- » नेहरूनगर अग्निशमन केंद्र – ८४८४०५११०१

# डेंग्यू व मलेरियाला थोपविण्यासाठी पालिकेची व्यापक मोहीम

## घराघरांत तपासणी, औषध फवारणी व जनजागृतीवर भर; 40 लाख 58 हजार रुपयांचा दंड वसूल

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिका डेंग्यू व मलेरियासारख्या संसर्गजन्य आजारांना आळा घालण्यासाठी सातत्याने कार्यरत असून, नागरिकांच्या आरोग्यरक्षणासाठी मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवत आहे. या मोहिमेअंतर्गत घराघरांत तपासणी, औषध फवारणी, जनजागृती उपक्रम तसेच कठोर दंडात्मक कारवाईला गती देण्यात आली आहे. याच अनुषंगाने १ जून २०२५ पासून आतापर्यंत सुमारे ४ हजार १३७ ठिकाणी नोटिसा बजावल्या असून, १ हजार १४२ जणांवर थेट दंडात्मक कारवाई करून ४० लाख ५८ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.



महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपायुक्त सचिन पवार यांच्या अधिपत्याखाली महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून औषध फवारणी, घराघरांत तपासणी, बांधकामस्थळांवरील पाहणी, कंटेनर तपासणी तसेच जनजागृती कार्यक्रम व दंडात्मक कारवाई अशा बहुआयामी मोहिमांना गती देण्यात आली आहे. महापालिकेच्या आठही क्षेत्रीय कार्यालयांतून समन्वय साधून याबाबतचा एकत्रित आराखडा तयार करण्यात आला आहे. या उपक्रमांमुळे डासांची उत्पत्ती कमी होत असून, संसर्गजन्य आजारांवर नियंत्रण मिळवण्यास मदत होत आहे.

> “ पिंपरी चिंचवड महापालिकेने डेंग्यू व मलेरियासारख्या संसर्गजन्य आजारांवर आळा घालण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने उपाययोजना राबवल्या आहेत. औषध फवारणी, घराघरांत तपासणी, बांधकामस्थळांवरील पाहणी, कंटेनर तपासणी यांसोबतच नागरिकांसाठी जनजागृती मोहिमा राबवण्यात महापालिकेकडून प्राधान्य दिले जात आहे. या मोहिमेमुळे डासांची उत्पत्ती कमी होऊन संसर्गजन्य आजारांवर नियंत्रण मिळवण्यास मदत होत आहे. पुढील काळातही ही कारवाई अधिक काटेकोरपणे व नियोजनबद्ध राबवली जाईल.
>
> **- विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

पालिकेने १ जून २०२५ पासून १४ सप्टेंबर २०२५ पर्यंत ९ लाख ८० हजार ३८० घरांची पाहणी तसेच तपासणी केली. त्यापैकी १४ हजार २७४ घरांच्या परिसरात डास उत्पत्तीची चिन्हे आढळली. विविध ५१ लाख ८४ हजार ९७२ कंटेनर भांडी,ड्रम,कुंड्या,पाणी साठवणीची ठिकाणे आदी तपासले गेले; त्यापैकी १५ हजार ४०७ ठिकाणी डास वाढीस पोषक वातावरण नोंदले गेले. टायर पंक्चरची व भंगार दुकाने तपासून तातडीने सूचना व सुधारणा करण्यात आला 2 हजार हून अधिक कन्स्ट्रक्शन साइटवर तपासणी करण्यात आली. एकूण ४ हजार १३७ ठिकाणी नोटिसा बजावल्या तर १ हजार १४२ नागरिक व आस्थापनांवर थेट दंडात्मक कारवाई करून ४० लाख ५८ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे.

# अवजड वाहनांची रस्त्यावर अवैद्य पार्किंग; नागरिक त्रस्त

## जवळपास शाळा असल्याने ये-जा करणाऱ्या नागरिकांना, महिलांना नाहक त्रास

**पिंपरी | प्रतिनिधी**

सेक्टर १२ पीएमआरडीए हौसिंग सोयाटीच्या बाजूला पावनधाम सोसायटी ते श्रीराम चौक दरम्यान रस्त्याच्या कडेला अवजड वाहनांची अवैद्य पार्किंग केली जाते. जवळपास शाळा असल्याने ये-जा करणाऱ्या नागरिकांना, महिलांना नाहक त्रास सहन करावा लागतो आहे. तत्काळ यावर कारवाई करावी अशी मागणी सोसायटीधारकांकडून केली जात आहे.




रस्त्याच्या कडेला मोठ-मोठे ट्रेलर दररोज उभे असतात. अवैद्य ठिकाणी पार्किंग केली जाते. काही बंदावस्थेतील ट्रेलर (अवजड वाहने) महिनोमहिने त्याच ठिकाणी असतात. बाजूला लागूनच दोन मोठ्या शाळा, सोसायट्या आहेत. पावनधाम, नवकार प्राईड, रिचवुड, तुलसी आर्केड या सोसायट्या आहेत. मुलांना शाळेत सोडायला जाताना-येताना महिलावर्गांना नाहक त्रास होतो आहे. अवैद्यरित्या रस्त्याच्या कडेला अवजड वाहने पार्किंग करून ड्राईव्हर लोक तिथें जेवन बनवता, खरकटे, कचरा तिथेच रस्त्यावर टाकतात, मोठ-मोठ्या गाणी लावली जातात. याबाबत वारंवार सोसायटीधारकांनी तक्रारी केल्या आहेत.

> “ परिसरातील सोसायटीधारक आमच्याकडे तक्रारी घेऊन येतात. अवजड वाहनांच्या अवैद्य पार्किंगचा त्रास महिलावर्गांना मोठ्या प्रमाणात होतो. मुलांना शाळेत ने-आण करताना त्यांना नको-नकोसे होते. याबाबत महिलांनी तक्रारी केल्या आहेत. लवकरात-लवकर यावर कारवाई होणे आवश्यक आहे.
>
> **- निखिल काळकुटे, सामाजिक कार्यकर्ते.**

> “ ड्राईव्हर लोक उघड्यावर बाथरूमला, जेवन केलेला कचरा तिथेच टाकतात, रात्रीच्यावेळी ये-जा करताना महिलांना त्रास होतो. रस्त्याच्या कडेला मोठ-मोठे हे कंटेनर असल्याने अंधारात भिती वाटते त्यामुळे त्यावर कारवाई करण्याची मागणी केली होती.
>
> **- ऋतुजा पोटुळे, नवकार प्राईड.**

> “ अवैद्यरित्या पार्किंग केलेल्या अवजड वाहनांवर (ट्रेलर) वर सातत्याने कारवाई केली जाते. त्याचे प्रमाण अजून वाढवून अवैद्य पार्किंग कमी करू. परिसरातील सोसायटीच्या नागरिकांच्या तक्रारी आमच्याकडे आल्या आहेत. कारवाईचे प्रमाण अजून जास्त वाढून आर्थिक दंड लावून हे प्रमाण कमी करू म्हणजे नागरिकांना त्रास होणार नाही.
>
> **- दीपक साळुंके, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, भोसरी पोलिस वाहतूक विभाग.**

# बिल्डरांची मस्ती उतरवा; उपमुख्यमंत्री अजित पवार

## अजितदादांनी अधिकाऱ्यांना सुनावले; केशवनगर, मुंढवा, घोरपडीतील नागरिकांशी साधला संवाद

**पुणे | प्रतिनिधी**

'राष्ट्रवादी परिवार मिलन' या उपक्रमांतर्गत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रविवारी केशवनगर, मुंढवा व घोरपडी येथील नागरिकांशी संवाद साधला. या वेळी केशवनगर परिसरातील काही सोसायट्यांमधील नागरिकांनी बिल्डरांच्या चुकीमुळे पिण्याचे पाणी मिळत नसल्याचे सांगितले. त्यावर नागरिकांना समस्या येत असतील, तर बिल्डरांचे काम थांबवा. त्यांना मस्ती आली असले, तर ॲक्शन घेणे प्रशासनाच्या हाती असल्याचे उपमुख्यमंत्री पवार यांनी या वेळी अधिकाऱ्यांना सुनावले.



केशवनगर-खराडीदरम्यान नदीपात्रातील अपूर्णावस्थेत असलेल्या पुलाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना या वेळी उपमुख्यमंत्री पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. रस्त्यांची दुरवस्था, वाहतूक कोंडी, पाणीपुरवठा आदी समस्यांची निवेदने नागरिकांनी त्यांनी दिली.

मुंढव्यातील महात्मा फुले चौकातील वाहतूक कोंडीच्या समस्येची उपमुख्यमंत्री पवार यांनी पाहणी केली. आमदार चेतन तुपे, महापालिकेचे आयुक्त नवल किशोर राम, हडपसर क्षेत्रीय कार्यालयाचे सहायक आयुक्त बाळासाहेब ढवळे पाटील, माजी उपमहापौर बंडू गायकवाड, माजी नगरसेविका सुरेखा कवडे, माजी नगरसेवक आनंद आलकुंटे, अशोक कांबळे, साहेबराव कवडे, देवेंद्र भाट, गणेश ढाकणे, संतोष पाखरे, संदीप कवडे, दिलीप माथवड, हेमराज कवडे, कैलास दळवी, नीलेश कवडे, काका पवार, रामभाऊ कसबे आदी उपस्थित होते.

केशवनगर येथील काही मोठ्या सोसायट्यांमध्ये नागरिकांनी पिण्याचे पाणी येत नसल्याच्या तक्रारी उपमुख्यमंत्री पवार यांच्याकडे केल्या. याविषयी संबंधित बांधकाम व्यावसायिकांचे काम थांबविण्याच्या सूचना त्यांनी महापालिकेच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

मुंढवा येथील महात्मा फुले चौकात पाहणी करून येथे होणाऱ्या वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. रामटेकडी येथील वंदे मातरम चौकात उपमुख्यमंत्र्यांनी नागरिकांशी संवाद साधला. घोरपडी येथे कार्यकर्त्यांशी त्यांनी संवाद साधला.

पर्रीकर यांच्यासारखी न सांगता पाहणी करा; म्हणजे वस्तुस्थिती तुमच्या लक्षात येईल,' असा सल्ला या महिलेने त्यांना दिला. त्यावर पर्रीकर कोण? असा प्रतिप्रश्न पवार यांनीउपस्थित केला. त्यावर संबंधित महिलेने मनोहर पर्रीकर ते गोव्याचे मंत्री होते, असे सांगितले. त्यानंतर मी एकटा फिरेन; पण मला मीडियाने फिरू दिले पाहिजे, असेही उपमुख्यमंत्री पवार यांनी या वेळी नमूद केले.

### पर्रीकरांसारखी करा न सांगता पाहणी...

» उपमुख्यमंत्री अजित पवार केशवनगर-खराडी नदीपात्रातील पुलाची माहिती घेत असताना एका महिलेने 'वाहतूक कोंडीला आम्ही कंटाळलोय, इथे राहायचे की नाही?' असा प्रश्न त्यांच्यासमोर उपस्थित केला.

### उपमुख्यमंत्री सकाळी सहाला केशवनगरमध्ये

»अजित पवार यांच्या गाड्यांचा ताफा सकाळी सहा वाजता केशवनगर येथे दाखल झाला. त्यानंतर पूर्वाकरा सोसायटीपासून पुढे नदीपात्रापर्यंत अधिकारी आणि कार्यकर्त्यांसमवेत जाऊन त्यांनी अपूर्णावस्थेतील पुलाची पाहणी केली. हे काम येत्या 15 जानेवारीपर्यंत पूर्ण होईल, असे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी या वेळी सांगितले. मात्र, शक्य तेवढ्या लवकर या पुलाचे काम पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

# सिंहगड-पानशेत परिसरात करपा रोगाचा प्रादुर्भाव

## शेकडो हेक्टर क्षेत्रातील उभी पिके भुईसपाट; शेतकऱ्यांवर आर्थिक संकट

**पुणे | प्रतिनिधी**

राजगड आणि हवेली तालुक्यात भात पिकावर करपा तसेच तुडतुडे यांसारख्या रोगांचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव झाला असून शेकडो हेक्टर क्षेत्रातील उभी पिके भुईसपाट झाली आहेत. या एकमेव उत्पन्नाच्या साधनावर पाणी फिरल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे.



राजगड तालुक्यातील पानशेत धरण परिसरात परिस्थिती गंभीर आहे. शिरकोली येथील शेतकरी भीमराव, शिवाजी, रामभाऊ पडवळ यांची पिके पूर्णपणे वाया गेली आहेत. 'संपूर्ण वर्षभराचे कष्ट मातीमोल झाले असून आता कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे,' असे शेतकरी रामभाऊ पडवळ यांनी सांगितले. घोडशेत, ठाणगाव, माणगाव, पोळे, टेकपोळे येथेही अशीच स्थिती आहे.

**प्रशासनावर शेतकऱ्यांचा रोष**

बारामती लोकसभा मतदारसंघ काँग्रेसचे अध्यक्ष लहूअण्णा निवंगुणे यांनी प्रशासनाच्या निष्क्रियतेवर टीका करताना सांगितले की, 'सिंहगड-पानशेतच्या डोंगरी भागात कृषी व महसूल विभाग फिरकतच नाही. शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असूनही प्रशासन हातावर हात धरून बसले आहे.

**नुकसानीचे क्षेत्र**

राजगड तालुका : दीड हजार हेक्टर भातशेती करपा रोगाने बाधित.

हवेली तालुका : 3200 हेक्टर लागवडीतून सिंहगड-पश्चिम भागातील 50-100 एकर पिके वाया.

### सिंहगड-पश्चिम हवेलीतील पिकांचेही नुकसान

» सिंहगड पायथ्यावरील रहाटवडे, खामगाव मावळ, मोगरवाडी, वरदाडे, वसवेवाडी आदी गावांतील शेतकऱ्यांचेही मोठे नुकसान झाले आहे. हिरवाईने नटलेली भातशेती एका आठवड्यात करपा रोगाने ओसाड झाली आहे. चंद्रकांत दारवटकर, लक्ष्मण दारवटकर, अविनाश मिंडे, रामदास गांडले, प्रमोद भोसले, बाबू होले, प्रशांत भोसले, किसन दुधाणे, विनोद लोहकरे, उमेश थोपटे, धोंडिबा वालगुडे, माधू थोपटे, रमेश निडाळकर, जयराम दारवटकर यांच्यासह शंभराहून अधिक शेतकऱ्यांची पिके वाया गेली आहेत. तातडीने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

"करपा हा बुरशीजन्य रोग असून, तो अतिशय वेगाने पसरतो. त्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी शेतकऱ्यांनी तातडीने बुरशीनाशकांची फवारणी करावी. दरम्यान, हवेली तालुका कृषी अधिकारी अमित रणवरे यांनी सांगितले की, 'शेतकऱ्यांनी रोगाने बाधित पिकांचे फोटो काढून सादर करावेत. कृषी अधिकारी व सहाय्यकांना पाहणीचे आदेश दिले आहेत.

**- विश्वजित सरकाळे, उपकृषी अधिकारी, सिंहगड विभाग.**

# लोकअदालतीत साडेदहा कोटींची वसुली

## बारामतीत 5348 खटले निघाले निकाली; एकूण 10 कोटी 46 लाख 9 हजार 587 रुपयांची वसुली

**पुणे | प्रतिनिधी**

बारामती येथील जिल्हा व सत्र न्यायालयात शनिवारी (दि. 13) झालेल्या राष्ट्रीय लोकअदालतीत दाखल पूर्व व दाखल खटल्यामध्ये तडजोड होऊन एकूण 5348 खटले निकाली निघाले असून एकूण 10 कोटी 46 लाख 9 हजार 587 रुपयांची वसुली झाली.

बारामती जिल्हा न्यायालयाचे मुख्य जिल्हा न्यायाधीश व्ही. सी. बर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली बारामती विधी सेवा समिती व बारामती वकील संघटना अध्यक्ष अ‍ॅड. प्रसाद खारतुडे व सदस्य यांच्या संयुक्त विद्यमाने हे लोकन्यायालय पार पडले.

लोकन्यायालयासाठी आठ पॅनेल तयार करण्यात आले होते. जिल्हा न्यायाधीश व्ही. सी. बर्डे, जिल्हा न्यायाधीश एस. आर. पाटील, दिवाणी न्यायाधीश डी. एस. झंवर, सहदिवाणी न्यायाधीश एस. टी. चिकणे, श्रीमती व्ही. बी. पाटील, दिवाणी न्यायाधीश पी. पी. काळे, व्ही. व्ही. देशमुख, श्रीमती टी. डी. इंगवले यांनी वकिलांसह पॅनेल प्रमुख म्हणून काम पाहिले.



बारामती वकील संघटनेचे अध्यक्ष अ‍ॅड. प्रसाद खारतुडे, उपाध्यक्ष अ‍ॅड. अनुप चौगुले, उपाध्यक्ष अ‍ॅड. हर्षदा जगदाळे, महिला प्रतिनिधी अ‍ॅड. मोनिका कोठावळे, अ‍ॅड. श्वेता वणवे, अ‍ॅड. विजय कांबळे, अ‍ॅड. बनसोडे यांच्यासह वकील संघटनेचे सदस्य या वेळी उपस्थित होते. विधी सेवा समितीचे समन्वयक म्हणून मिलिंद देऊळगावकर यांनी काम पाहिले.

लोकन्यायालयात बँकेच्या वसुलीचे 461 खटले निकाली निघाले. त्यात 5 कोटी 93 लाख 38 हजार 965 रुपयांची वसुली झाली. मोटार अपघाताच्या 23 खटल्यांमध्ये 2 कोटी 33 लाख 39 हजार 683 रुपये नुकसानभरपाई पक्षकारांना मिळाली. पाणी वसुली, महावितरण वसुली, महसूल वसुली असे एकूण 10 कोटी 46 लाख 9 हजार 587 रुपयांची वसुली झाली.

### मोटार अपघातांत विमा कंपनीद्वारे मोठी भरपाई

» एचडीएफसी या विमा कंपनीने दोन प्रकरणात एकूण 58 लाख 50 हजार रुपये इतकी भरपाई देण्यात आली. एका प्रकरणात अ‍ॅड. प्रदीप देशमुख यांनी एका पक्षकाराला 27 लाख 25 हजार नुकसानभरपाई मिळवून दिली. दोन्ही प्रकरणात विमा कंपनीद्वारे अ‍ॅड. विशाल बर्गे यांनी काम पाहिले. एचडीएफसी कंपनीच्या वतीने मंगेश इनामदार यांनी काम पाहिले.

> “ वेळेचा सदुपयोग करून जास्तीत जास्त पक्षकारांनी तडजोडीमध्ये खटले मिटवल्याने पक्षकारांची वेळेबरोबर पैशांचीदेखील बचत होते. तसेच न्यायालयातील हेलपाटे वाचतात. त्यामुळे जास्तीत जास्त पक्षकारांनी तडजोडीने खटले मिटवावेत.
>
> **- व्ही. सी. बर्डे, मुख्य जिल्हा न्यायाधीश, बारामती.**

# भीमा, निरा नदीच्या पाणीपातळीत वाढ

## उजनी धरणामध्ये रविवारी सायंकाळी 6 वाजता 121.68 टीएमसी पाणीसाठा

**पुणे | प्रतिनिधी**

उजनी धरणातून भीमा नदीत, तर वीर धरणातून निरा नदीमध्ये पाणी सोडण्याच्या क्षमतेत वाढ करण्यात आल्याने इंदापूर तालुक्यातून वाहणाऱ्या भीमा व निरा नदीच्या पाणीपातळीत रविवारी (दि. 14) मोठी वाढ झाली.

उजनी धरणातून भीमा नदीपात्रात 26 हजार 600 क्युसेक, तर वीर धरणातून निरा नदीपात्रात 3 हजार 200 क्युसेक क्षमतेने पाणी सोडण्यात येत आहे. परिणामी, सध्या भीमा व निरा नदीचे पात्र पाण्याने तुडुंब भरून वाहत आहे. उजनी धरणामध्ये रविवारी सायंकाळी 6 वाजता 121.68 टीएमसी पाणीसाठा झाला आहे. उपयुक्त पाणीसाठा 58.02 टीएमसी असून, त्याची टक्केवारी 108.31 आहे.

उजनी धरणाच्या पाणीसाठ्यातून सीना-माढा उपसा सिंचन योजनेसाठी 180 क्युसेक, बोगद्यामधून 200 क्युसेक आणि मुख्य कालव्यातून 600 क्युसेक याप्रमाणे पाण्याचा विसर्ग सध्या सुरू आहे. दरम्यान, उजनी धरणामध्ये दौंड येथून भीमा नदीपात्रात येणाऱ्या पाण्याचा विसर्ग कमी झाला असून, तो सध्या 3 हजार 270 क्युसेक एवढा आहे.

दुसऱ्या बाजूला वीर धरणातून निरा नदीत पाणी सोडणे हे गेल्या काही दिवसांपासून बंद करण्यात आले होते. मात्र, पाणलोट क्षेत्रामध्ये पाऊस सुरू झाल्याने धरणातून शनिवारी सायंकाळी 7 वाजता 3 हजार 200 क्युसेकने विसर्ग सुरू करण्यात आला.



त्यामध्ये रात्री 12.30 वाजता वाढ करून विसर्ग 7 हजार 827 क्युसेक करण्यात आला. मात्र, पावसाचे प्रमाण कमी झाल्याने विसर्ग रविवारी 10 वाजता पुन्हा 3 हजार 200 क्युसेक ठेवण्यात आला आहे. दरम्यान, आगामी काळात शेतकऱ्यांचे लक्ष हे भीमा व निरा नदीवरील बंधारे पूर्णक्षमतेने अडवण्याकडे लागले आहे, असे प्रगतशील शेतकरी शरद जगदाळे-पाटील (टणू) यांनी सांगितले.